
ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016

Indian Streams Research Journal

# "ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता"

डॉ. डी. आर. बाड
सहयोगी प्राध्यापक,उमा महाविद्यालय, पंढरपूर .



## प्रस्तावना :–

सध्याच्या जागतिकीकरणाच्या आणि खाजगीकरणाच्या आर्थिक जगतामध्ये भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्था असाणाऱ्या देशामध्ये सद्यस्थितीला आर्थिक मंदी रोडावलेली अर्थव्यवस्था आणि वाढत जाणारी बेरोजगारी छोट्याा आणि मध्यम उद्योग व्यवसायांना लागलेली घरघर या पार्श्वभूमीवर राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची प्रकर्शाने जाणीव होते. शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची आणि शेतकरी कष्टकऱ्यांची दुरावस्था पाहिल्यानंतर गांधीजींच्या खेड्याकडे चला आणि स्वयंपूर्ण खेड्यांची अर्थव्यवस्था यासंबंधीचे विचार आपल्याला पुन्हा ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे घेवून जातात. मोठे उद्योग, यांत्रिकीकरण, भांडवलीकरण आणि झगमगत्या बाजारपेठा या काही लोकांना भांडवलशाहीचा लाभ मिळवून देतील. परंतू सर्वसामान्य शेतकरी, कारागीर यांच्या रोजी रोटीचा प्रश्न सोडवू शकत नाहीत. म्हणून गांधीजींच्या आर्थिक विचारांचा मागोवा घेवून सद्यस्थितीत ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि ग्रामीण विकासासाठी आपणास काय वाटचाल करता येईल यासंबंधीचे विवेचन सदर शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयास केलेला आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टये :–

1. गांधीजींची ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.
2. सद्यस्थितीत अर्थव्यवस्थेमध्ये शेती आणि ग्रामीण विकाससंबंधीचे प्रश्न सोडविण्यासाठीच्या दृष्टीने गांधीजींच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
3. ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने गांधी विचारांचा आढावा घेणे.
4. लघु व कुटीर उद्योगांच्या समस्या आणि शेतीची दुरावस्था यावर उपाय म्हणून गांधी विचारांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुचित करणे.

## संशोधन पध्दती :–

सदर शोधनिबंधाच्या मांडणीसाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे. गांधीजींच्या जीवनावरील आधारित संदर्भग्रंथ, सद्यस्थितीतील अर्थव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणारे विविध लेख, चर्चा यांचा आधार घेण्यात आलेला आहे.

## गांधीजींची आर्थिक विचार धारा :–

गांधीजींचे आर्थिक विचार हे आध्यात्मिक, सामाजिक तत्वावर आधारित आहेत. भौतिक सुखावर आधारित पाश्चात्य विकासाचे प्रतिमान हे हवेतील गुणाकारासारखे आहे. विकासाचा आभास होतो. परंतु वास्तवात लोकांच्या

किंवा समुदायाच्या गरजा पूर्ण करण्यामध्ये ते कितपत उपयुक्त आहे याबाबत गांधीजींच्या मनामध्ये शंका होती. त्यामुळे गरीब, मागासलेला वर्ग व समाजातील शोषीत घटकासाठी महात्मा गांधींनी सामाजिक – आर्थिक आव्हानासाठी लक्ष देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लढ्यामध्ये अहिंसा, स्वदेशी आणि असहकार या तत्वांच्या आधारावर आत्मनिर्भर होण्याचे तत्वज्ञान गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या केंद्रस्थानी होते. ब्रिटिश वसाहत काळामध्ये युरोपियन औद्यागिक वस्तुंनी भारतातील बाजारपेठा काबीज केल्यामुळे भारतीय कामगार स्त्रिया यांचे जीवन निरस आणि निर्जीव झालेले होते. गरीबी आणि बेकारी याचे मूळ कारण ब्रिटिश वसाहतवाद आणि औद्योगिक वस्तूंची आयात यामध्ये दडलेले होते. म्हणून गांधीजींनी आत्मनिर्भरता आणि स्वावलंबनासाठी या वसाहतवादाचा शांततेच्या मार्गाने प्रतिकार केला. देशात रोजगार आणि वेतनासाठी संघर्ष करणाऱ्या शेतमजूर आणि कामगारांच्यासाठी गांधीजींनी जमिनदार आणि गिरणीमालक यांच्या विरूध्द सत्याग्रहाच्या माध्यमातून आंदोलन आणि उपोषण केले. याचे उदाहरण म्हणजे गुजरातमधील खेडा जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांची पिके बुडाली. परंतु जमिनदार शेतसारा वसूल करत असत म्हणून 1918 मध्ये शेतसारा वसुलीस विरोध म्हणून गांधीजींनी सत्याग्रह केला. तसेच गिरणी कामगारांच्या प्रश्नासाठी कामगारांना संप करण्याचा सल्ला देवून मागण्या मान्य करण्यासाठी 21 दिवस उपोषण करून पाठिंबा दिला.

### स्वावलंबन आणि आत्मनिर्भरता :–

भांडवलदार आणि जमिनदारांच्या आहारी न जाता सर्वसामान्य कामगार व शेतकरी वर्ग व महिलांनी स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी स्वतः कापड तयार करणे आणि आवश्यक वस्तूंची निर्मिती करून शिक्षण, आरोग्य या सेवाही स्वावलंबनातून उपलब्ध करून देणे, महिलांना सन्मान आणि समानता या माध्यमातून आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा मार्ग गांधीजींनी देशाला दाखवून दिला. गांधी अनुयायांनी ठिकठिकाणी आश्रमांची स्थापना करून सेवा आणि स्वावलंबनाची कार्यशाळाच उभी केली. गांधीजींची समतावादी संकल्पना ही भौतिक विकासाऐवजी मानवी सन्मान जपण्याच्या विचारांची होती.

### औद्योगिकरण आणि अति भांडवल वाद :–

गांधीजींच्या मते विकासाचे उद्दिष्ट्या साध्य करायचे असेल तर आर्थिक क्षेत्रात अहिंसक, नैतिक आणि सत्यवादी असले पाहिजे. यासाठी भांडवलाचे केंद्रीकरण न होता सहकार, विश्वस्तता आणि आर्थिक उपक्रमांचे विकेंद्रीकरण केले पाहिजे आणि त्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना जास्त प्राधान्य दिले पाहिजे. औद्यागिकरणामुळे निष्क्रियता वाढते आणि शोषण मोठ्या प्रमाणावर होते. स्पर्धा वाढून विपणनाची समस्या उद्भवते म्हणून औद्योगिकरण आवश्यक तेवढेच आणि पर्यावरण पुरक असावे. औद्योगिकरणाचा वापर इतरांच्या शोषणाचे साधन असून नये.

### ग्रामीण विकास आणि ग्रामराज्य :–

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांच्या विकासाशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होवू शकत नाही. म्हणून सद्यस्थितीतील ग्रामीण जीवन ग्रामराज्य आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या संबंधीचे काय विचार आहेत यावर दृष्टिक्षेप टाकला असता ग्राम स्वराज्यामध्ये मानव हा केंद्रबिंदू आहे. ग्रामीण जीवनामध्ये शारिरीक क्षेम, समानता, संरक्षण, संपत्तीचे व सामाजिक विकेंद्रीकरण, राजकीय विकेंद्रीकरण, स्वदेशी आणि स्वावलंबन, सहकार्य यावर आधारित आदर्श ग्राम जीवन पध्दती ही आदर्शवत असेल आणि ती शेतकरी, शेतमजूर, कारागीर यांच्या सहकार्यातून विकसित हात जावून ग्रामीण जीवनमान उंचावेल अशी जीवन पध्दती आदर्शवत असेल आणि यातूनच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणता येईल.

### आजची भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती भांडवलीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरूप :–

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1951 पासून ग्रामीण विकासासाठी आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी अनेक योजना राबवूनही आपणास पूर्णपणे विकास साधता आलेला नाही. खुल्या भांडवलशाही धोरणामुळे आणि मुक्त बाजार यंत्रणेमुळे जगातील काही राष्ट्रे श्रीमंत झाली. आणि देश पातळीवर काही भागांचा, शहरांचा आणि काही उद्योगपतींचा आणि पर्यायाने काही उद्योगांचा विकास झाला. यातूनच नव –भांडवलशाही उदयाला येवून आर्थिक विषमता, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण निर्माण झाले. आर्थिक मंदीतून मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीसारखे प्रश्न निर्माण झाले. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये शेतीची दुरावस्था, उद्योग आणि रोजगाराचा अभाव, खेडी ओस पडत आहेत तर दुसरीकडे शहरे फुगत आहेत. लोक रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करत आहेत. शहरामध्ये नविन

समस्या निर्माण होत आहेत. खेडी आणि शहरातील जीवन अस्थिर झालेले आहे. मॉल संस्कृती आणि बहुराष्ट्रीय कंपन्या, ऑनलाईन खरेदी यामुळे सर्व संपत्ती आणि पैसा ठराविक लोकांच्या हातामध्ये एकवटत आहे. त्यामुळे छोटे व्यावसायिक छोटे उद्योग बंद होवून बेरोजगारी वाढत आहे, त्यामुळे लोकांच्या हातातील पैसा कमी होऊन त्यांची खरेदी शक्ती घटत आहे. दुसऱ्या बाजूला ग्रामीण शेतकरी शेतमजूर शेती व्यवस्थेतील दुरावस्थेमुळे मस्त आहे. त्यांचीही खरेदी शक्ती घटलेली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून अनेक वस्तूंची मागणी कमी होवून उत्पादन आणि रोजगारात घट होत आहे. अशा परिस्थितीत गांधीवादी अर्थशास्त्राची विचारसरणी सद्यस्थितीतील समस्येवर उपाय शोधण्यासाठी किती उपयुक्त आहे हे प्रकर्षाने जाणवते.

## सद्यःस्थितीतील वाढती ग्रामीण आणि शहरी बेरोजगारीच प्रश्न सोडविण्यासाठी गांधीवादी अर्थशास्त्राची उपयुक्तता :—

वरील प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा दुरावस्थेच्या पार्श्वभूमीवर गांधीजींचे स्वावलंबनाचे व विकेंद्रीत विचारांचे अर्थशास्त्र योग्य, उपयुक्त ठरू शकते. त्यासाठी आधुनिकता आणि गांधीजींची आर्थिक विकासाची विचारधारा यांचा समन्वय साधून विकासाचे एक नविन प्रारूप  तयार करता येईल. सद्यस्थितीत विकासाची नवी दिशा ही एक भुलावण आहे असे आता जाणवत आहे. लाखो खेडी आणि खेड्यातील संस्कृती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सध्या अडचणीत आहे. जी शहरे विकसीत झाली तेथेही आता उद्योग बंद पडत आहेत. बेरोजगारी वाढत आहे. तरीही ग्रामीण भागात संधी नसल्याने आणि निसर्गाच्या अवकृपेमुळे लोक रोजगारासाठी शहराची वाट धरत आहेत. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेत अस्वस्थता असून रोजगार नाही, शेत मालाला भाव नाही. परिणामी उत्पन्नाची साधने संकुचित होवून ग्रामीण भागातील 60 टक्के जनतेची खरेदीशक्ती कमी होत आहे. त्याचा परिणाम बाजारपेठेवर होवून मागणी अभावी मंदीसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. तर दुसरीकडे मोठे मोठे मॉल्स, ऑनलाईन शॉपींग यामुळे शहरी भागातील छोटे व्यावसायिक, किरकोळ विक्रेते यांच्या व्यवसायांची उलाढाल कमी झालेली आहे. प्रभावी मागणीच्या अभावामुळे आणखी बेरोजगारी वाढून आर्थिक विषमता वाढीस लागेल म्हणून सद्यस्थितीत गांधीजींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता वाढत आहे.

गांधीजींच्या स्वप्नातील भारत विकसीत करावयाचा असेल तर सांप्रदायिकता आणि भेदभाव याच्या ऐवजी अर्थव्यवस्थेच्या सद्यस्थितीकडे लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये शेती विकासासाठी आणि शेतमजूरांच्या हाताला काम देण्यासाठी तसेच शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी जागृती आणि चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. त्यासाठी शांततेच्या मार्गाचा अवलंब केला जावा. ग्रामीण कारागीरांना गावातच रोजगार आणि उत्पादित मालाला बाजारपेठ मिळाली तर खेड्यातील पैसा खेड्यातच खेळता राहिल. लोकांचे उत्पन्न वाढून मागणी वाढेल, आपोआप शहरी अर्थव्यवस्थेकडे एकवटणारा पैसा ग्रामीण भागामध्ये राहिल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले पारंपारिक व्यवसाय व उद्योग खेड्यातच विकसीत करता येतील. त्यातून गांधीजींना अभिप्रेत असणारी स्वावलंबन, आत्मनिर्भरता आणि स्वयंरोजगाराची उद्दिष्ट्ये गाठता येतील. संपत्तीचे आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम करता येईल. शारिरीक श्रम, समानता, स्वदेशी (स्थानिक), स्वावलंबन, ग्रामीण सहकार्य यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम होवून ग्रामीण उद्योग, कुटीर उद्योग यांचे जाळे निर्माण होवून, स्वयंपूर्ण आणि समृध्द अशी ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण झाल्यास खऱ्या अर्थाने ग्रामराज्याची ग्रामीण विकसीत भारताची अर्थव्यवस्था निर्माण होईल. आपोआपच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळून बेरोजगारी, मंदी, विषमता या प्रश्नांची तीव्रता कमी होवून देश शाश्वत विकासाच्या दृष्टीने वाटचाल करेल. अर्थशास्त्रज्ञ केन्सच्या मतानुसार बहुतांश लोकांच्या हातात पैसा नसेल तर प्रभावी मागणी कमी होवून बेरोजगारी वाढते म्हणून ग्रामीण लोकांच्या रोजगारात आणि उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय आणि गरीब जनता, कारागीर, कामगार यांच्या उत्पन्नात वाढ होवून त्यांची खरेदीशक्ती वाढली तरच प्रभावी मागणी वाढून, उत्पादन वाढेल आणि बेरोजगारी कमी होईल, म्हणून मोठे उद्योग  आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची नफेखोरी यातून भारतासारख्या मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या असणाऱ्या देशाचे प्रश्न सुटणार नाहीत. त्याला गांधीजींच्या आर्थिक विचारावर आधारित नविन विकासाचे प्रारूप निर्माण करून राबविणे आवश्यक आहे. म्हणून आजही गांधीजींचे आर्थिक विचार समर्पक आहेत.

## निष्कर्ष :—

1. सद्यस्थितीत आर्थिक मंदी, बेकारी या अर्थव्यवस्थे समोर समस्या.
2. गांधी विचारामध्ये ग्राम स्वराज्य, स्वावलंबन, सहकार्य यावर आधारित परिपूर्ण अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे सामर्थ्य.

3. सद्यस्थितीतील आर्थिक समस्या सोडविण्यासाठी आधुनिकता आणि गांधी विचारांचे विकासाचे धोरण यांचा समन्वय आवश्यक.
4. पूर्णतः भांडवलशाही आणि भौतिक घटकावर आधारित विकासाने मानवी विकास असंभव असल्याने गांधीजींच्या आर्थिक विचारावर आधारित स्वावलंबी ग्राम अर्थव्यवस्था उभारणे आवश्यक आहे.
5. मोठ्या आणि भांडवलप्रधान तंत्र उद्योगापेक्षा श्रमप्रधान आणि उपयुक्त वस्तू व सेवा निर्मिती लघु व कुटीर उद्योगांचा विकास आवश्यक आहे.
6. लहान शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर, छोटे व्यावयायिक यांचे संरक्षण त्यांच्या हक्कासाठी गांधीजींच्या शांततेच्या मार्गाने सत्याग्रह, संप, चळवळी उभारणे आवश्यक.
7. गांधीजींच्या विचारावर आधारित विषमता कमी करणे आणि स्वयंरोजगारावर भर दिल्यास लोकांची क्रयशक्ती वाढून गरजा भागविल्या जातील आणि बेरोजगारी कमी होईल.
8. विकसीत आणि अविकसीत असा असमतोल कमी करण्यासाठी गांधीवादी विकासाचे प्रारूप आवश्यक आहे.

एकंदरीत गांधीजींचे विचार हे मानवतावादी व मानवाच्या कल्याणाच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. मानव कल्याणाच्या दृष्टीने वाटचाल करित असताना दारिद्र्य आणि बेरोजगारी हे प्रश्न अडथळा ठरत आहेत. त्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप लघु व कुटीर उद्योगांचा झालेला ऱ्हास यामुळे वाढणारी बेकारी नियंत्रीत केली तरच अपाणास दारिद्र्य कमी करून गांचींना अभिप्रेत असणारे जनकल्याण साध्य करता येणार नाही. म्हणून उध्वस्थ झालेली ग्रामीण अर्थव्यवस्था पुन्हा उभी करण्यासाठी गांधीजींच्या विचाराप्रमाणे खेड्याकडे चला आणि कृषीवर आधारित लघु व कुटीर उद्योगांच्या विकासावर भर दिल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होवून लोकांच्या गरजा ग्रामीण भागातच भागविल्या जातील आणि लोकांचे उत्पन्न वाढून दारिद्र्याचे प्रमाण कमी होईल. म्हणून कमी भांडवलावर चालणाऱ्या लघु आणि कुटिर उद्योगावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. म्हणूनच ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी गांधी विचारावर आधारित अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करणे काळाची गरज आहे.

## संदर्भ :–


1. बापू का प्रतिरोध – डॉ. सत्येंद्र रॉय
2. द स्टोरी ऑफ माय लाईप – एम. के. गांधी, भारतन कुमारप्पा, नवजीवन पब्लिकेशन, अहमदाबाद.
3. गांधीयन इकॉनॉमिक्स – विकीपीडीया
4. ब्रिटिश जर्नल ऑफ समाजशास्त्र – केथेन रिव्हेर
5. महात्मा गांधींच्या आर्थिक कल्पना – समस्या – डॉ. सुरेंद्र मैन
6. विविध मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रातील लेख –